निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २३१ वा.
शनिवार :२५ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणजे एक विचार, एक प्रेरणास्रोत - राज्यपाल आचार्य देवव्रत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे केवळ भारताचे नेते नाहीत, तर ते एक विचार आहेत, एक प्रेरणास्रोत आहेत. त्यांचे जीवन हे मानवतेच्या सेवेचे आणि राष्ट्रहितासाठीच्या अखंड समर्पणाचे उत्तम उदाहरण आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.लेखक बर्जिस देसाई लिखित 'मोदीज मिशन' या पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यांच्या हस्ते राजभवन येथे झाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, लेखक बर्जिस देसाई तसेच अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या आयुष्यात अनेक अशक्य वाटणारे निर्णय घेतले, जसे कलम ३७० रद्द करणे, रामजन्मभूमीचा प्रश्न शांततेत सोडवणे. तसेच जागतिक स्तरावर भारताचा सन्मान वाढवणे, हे त्यांच्या दृढ इच्छाशक्तीचे द्योतक असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यपाल देवव्रत म्हणाले की, प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या २५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत एकही दिवस सुट्टी घेतलेली नाही. देश, समाज आणि मानवतेच्या सेवेसाठी सतत कार्य करणे, हीच त्यांची साधना आहे.राज्यपालांनी लेखक बर्जिस देसाई यांचे अभिनंदन करताना म्हटले की, या पुस्तकात प्रधानमंत्री मोदी यांच्या जीवनातील विविध पैलूंना सखोलतेने स्पर्श केला असून, हे पुस्तक तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल. सर्वांनी हे पुस्तक वाचून, त्यातील विचारांद्वारे आपल्या जीवनात प्रेरणा घ्यावी. प्रधानमंत्री मोदी हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक आहेत; त्यांचे कार्य हे प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद असल्याचेही राज्यपाल देवव्रत म्हणाले.

'मोदीज मिशन' पुस्तकातून राष्ट्रनिर्मितीच्या प्रवासाचे दर्शन – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या विकासाची जी पायाभरणी केली आहे, ती अवर्णनीय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'मोदीज मिशन' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या पुस्तकात प्रधानमंत्री मोदी यांच्या जीवनाचा केवळ आढावा घेतलेला नाही, तर एका व्यक्तीच्या मूल्यांची, जाणीवेची आणि राष्ट्रासाठी झटण्याच्या वृत्तीची निर्मिती कशी होते, हे दाखवले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सेवा आणि संन्यास या दोन्ही मार्गांचा अनुभव घेतल्यानंतर, संघकार्याद्वारे राष्ट्रभावना जागृत करण्याचा संकल्प केला.

त्यांच्या नेतृत्वाखाली देशात ३७० कलम रद्द करणे, राम मंदिर उभारणी, नागरिकत्व कायदा किंवा तिहेरी तलाक बंदी यांसारख्या ऐतिहासिक निर्णयांचा साक्षीदार झाला आहे. या सर्व निर्णयांच्या मागे राष्ट्रचेतनेची जाणीव असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी न्यायव्यवस्थेचा सन्मान राखला आणि संस्थांना अधिक मजबूत केले. सरकार आणि न्यायसंस्था यांच्यातील संतुलन राखत त्यांनी लोकशाही संस्थांवरील विश्वास अधिक दृढ केला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हणाले.



अर्थव्यवस्थेसंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून भारताने जगातील विकसित अर्थव्यवस्थांनाही मागे टाकले आहे. नोटबंदी, जीएसटी आणि आयकर सुधारणा यांसारख्या उपाययोजनांनी करपालन संस्कृती रुजवली. पूर्वी कर टाळणे 'पुरुषार्थ' मानणाऱ्या समाजात आता करपालन ही नवी मूल्यव्यवस्था तयार झाली आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनी समाजातील गरीब, शेतकरी, युवा आणि महिला हेच भारताच्या आकांक्षांचे केंद्र मानले. या चार घटकांच्या उन्नतीतच विकसित भारताचा पाया असून 'मोदीज मिशन' पुस्तक भारताच्या विकासगाथेचा आरसा आहे असेही श्री.फडणवीस म्हणाले.

मोदी म्हणजे देशाचे वर्तमान आणि भविष्य – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे फक्त एक व्यक्तिमत्व नाहीत, तर देशाचे वर्तमान आणि भविष्य आहेत. त्यांच्या कामगिरीचा प्रवास संघर्षमय असून, तो प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे, असे उद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मोदीज मिशन' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी काढले.

हे पुस्तक फक्त नरेंद्र मोदींच्या चरित्राचे वर्णन नाही, तर त्यांच्या कार्याची सत्यकथा आहे. मोदींच्या व्यक्तिमत्वाची व्याप्ती एका पुस्तकात सामावणे शक्य नाही, कारण त्यांनी अशक्याला शक्य करून दाखवले आहे. मागील अकरा वर्षांत भारतात झालेले सकारात्मक बदल जगभरात कौतुकास्पद ठरले आहेत, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

जगातील अर्थव्यवस्था डगमगली असतानाही भारताची अर्थव्यवस्था चौथ्या स्थानी आली आहे आणि तिसरे स्थान मिळविण्याचे स्वप्न साकार होईल. 'डिजिटल इंडिया', 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या उपक्रमांचा उल्लेख करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढणे, महिलांना आत्मनिर्भर बनविणे, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देणे, हे सर्व मोदींच्या नेतृत्वामुळे शक्य झाले.या कार्यक्रमात मोदीज मिशन पुस्तकाचे लेखक बर्जिस देसाई यांनीही विचार मांडले.

## डॉ.अजय चंदनवाले यांच्याकडे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा अतिरिक्त पदभार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/



महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल तथा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलपती आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई येथील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांच्याकडे सोपविला आहे. विद्यापीठाच्या कुलगुरु ले. जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर यांचा कार्यकाळ समाप्त झाल्यामुळे हे पद रिक्त झाले होते.

## सरपंच यांनी स्वतःच्या मानधनातून साजरी केली कर्मचाऱ्यांची दिवाळी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी**/ गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन सावंगी ग्रुप ग्रामपंचायत च्या सरपंच मिनाताई संजय पांडव यांनी स्वतःला मिळणाऱ्या मानधनाची बचत करत एकूण बचत झालेल्या मानधनातून त्यांनी सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी कपडे व मिठाईची खरेदी केली. दिवाळीच्या पूर्वसंध्येला सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कपडे व मिठाई भेट म्हणून देण्यात आली.सरपंच पदाचा कारोबार सांभाळत असताना सर्वच कर्मचाऱ्यांचे सहकार्य गावाच्या विकासासाठी गरजेचे असते. ग्रामपंचायत हे एक कुटुंब आहे. आणि ग्रामपंचायत कर्मचारी ह्या कुटुंबाचा एक महत्त्वाचा भाग आहे. या कुटुंबाची प्रमुख या नात्याने यंदाची दिवाळी माझ्या या कुटुंबाच्या सदस्या सोबत साजरी करण्याचे ठरवले होते त्या अनुषंगाने आज माझ्या सरपंच पदाच्या मानधनातून कर्मचाऱ्यांसाठी कपडे व मिठाई खरेदी केली. सरपंच मिनाताई पांडव यांचे पती संजय पांडव यांनी देखील दोन वर्षांपूर्वी शंभर कुटुंबांना किराणा किट भेट म्हणुन दिली होती.दिपावलीच्या या भेटीमुळे कर्मचाऱ्यांनी सरपंच यांचे आभार व्यक्त केले.

## संरक्षण व एरोस्पेस उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची आता नवी ओळख - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**आत्ताचक्स्प्रेस**

**नागपूर/प्रतिनिधी**/सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस ही भारतातील अग्रगण्य उत्पादक कंपनी नागपूर येथे विस्तार करीत आहे. या अत्याधुनिक संरक्षण व एरोस्पेस उत्पादन प्रकल्पासाठी अटी व शर्तीनुसार मिहानतर्फे २२३ एकर जागेचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. रामगिरी निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात मिहान प्रकल्पातील वैशिष्ट्यपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्पासाठी जमिनीचे हस्तांतरण मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते सोलार कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांना करण्यात आले. याप्रसंगी सोलार ग्रुपचे संचालक मनीष नुवाल, राघव नुवाल, सोलारचे वरिष्ठ अधिकारी जे.एफ साळवे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे सह व्यवस्थापकीय संचालक तथा जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, वरिष्ठ व्यवस्थापक गौरव उपश्याम, संजय इंगळे आदी उपस्थित होते.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसच्या या नव्या विस्तारित प्रकल्पामुळे नागपूरला देशातील प्रमुख संरक्षण व एरोस्पेस उत्पादन केंद्र म्हणून नवी ओळख प्राप्त होणार असल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. हा उपक्रम महाराष्ट्राच्या 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' आणि औद्योगिक प्रगतीच्या विकासासाठी अधिक बळकटी देणारा असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्राच्या विकासासाठी शासनाने घेतलेल्या गुंतवणूकदार-अनुकूल धोरणांचा व अग्रगण्य उद्योगांचा वाढता विश्वास यावरून अधोरेखित होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी भारतात संरक्षण क्षेत्रात सुमारे १२ हजार ८० कोटींची गुंतवणूक करत आहे. नागपूर येथे यातील ६८० कोटी रुपयांची गुंतवणूक करून हा प्रकल्प मिहान मधील विशेष आर्थिक क्षेत्रात साकारला जात आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ४०० प्रत्यक्ष रोजगार निर्मिती व सुमारे एक हजार अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.

या प्रकल्पामुळे संरक्षण उत्पादन उद्योग क्षेत्रात नागपूरला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळणार असून विदर्भाच्या औद्योगिक प्रगतीत मोठी भर पडणार आहे.

महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित असून विविध उद्योजकांना गुंतवणुकीसाठी आकर्षित करणे, प्रादेशिक रोजगारनिर्मिती वाढवणे, संरक्षण व इतर उत्पादन क्षेत्रात राज्याला अव्वल स्थानी नेणे, हे मिहानचे ध्येय असल्याचे एमएडीसीचे सह व्यवस्थापकीय संचालक डॉ.विपीन इटनकर यांनी सांगितले.



# लघुदेहत्व : उंची नव्हे, विचारांची परिपूर्णता महत्त्वाची

मानवी जीवनाची खरी ओळख त्याच्या उंचीत, रूपात किंवा बाह्य स्वरूपात नसून, त्याच्या विचारांमध्ये, कर्मात आणि मनाच्या संवेदनशीलतेत असते. पण दुर्दैवाने, जगात आजही अनेक समाजमान्य निकष माणसा-ची किंमत ठरवतात. उंची, रंग, सौंदर्य किंवा शरीरयष्टी यावरून माणसाचे मोल मोजले जाते. अशाच पूर्वग्रहांचे सर्वाधिक ओझे सोसावे लागते त्या व्यक्तींना, ज्यांना लघुद-हत्व ही वैद्यकीय आणि सामाजिक स्थिती लाभलेली असते. त्यांच्या उंचीचा विचार करून समाज त्यांना 'लहान' म्हणतो, पण त्यांच्या मनाचा आणि धैर्याचा विचार केला, तर ते अनेकदा 'महान' ठरतात. दरवर्षी २५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लघुदेहत्व जागरूकता दिन' (International Dwarfism -wareness Day) म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे उद्दिष्ट आहे की, समाजातील सर्व स्तरांमध्ये लघुदेही व्यक्तींविषयी योग्य माहिती पोहा-चवणे, त्यांच्या अधिकारांबाबत जागरूकता निर्माण करणे, आणि समाजाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडवून आणणे. हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून, मानवतेची उंची दाखवणारा एक सामाजिक संदेश आहे.

लघुदेहत्व ही एक वैद्यकीयदृष्ट्या ओळ-खली गेलेली अवस्था आहे. सामान्यतः प्रौढ वयातील उंची चार फूट दहा इंच (सुमारे १४७ सें.मी.) पेक्षा कमी असणे हे लघुदेहत्व मानले जाते. मात्र ही केवळ उंचीची बाब नाही. हाडांच्या वाढीशी संबंधित सुमारे २०० पेक्षा अधिक आनुवंशिक किंवा वैद्यकीय कारणे यामागे असतात. सर्वाधिक सामान्य प्रकार म्हणजे अकाँड्रोप्लेशिया , ज्यात हाडांची वाढ मर्यादित राहते, पण बुद्धिमत्ता व मानसिक क्षमता अबाधित असते. त्यामुळे लघुद-हत्व हे अपूर्णता नसून, एक भिन्न शारीरिक स्थिती आहे. लघुदेहत्वाचे दोन प्रमुख प्रकार मानले जातात, त्यामध्ये प्रथम प्रकार म्हणजे असमप्रमाण लघुदेहत्व, ज्यामध्ये शरीराचे काही भाग प्रमाणात मोठे तर काही लहान असतात; आणि दूसरा प्रकार म्हणजे समप्रमाण लघुदेहत्व, ज्यामध्ये शरीर सर्व अंगांनी लहान असते पण समप्रमाणात असते. या दोन्ही प्रकारांमुळे काही शारीरिक अडचणी जसे की हाडांचे विकार, सांध्यातील वेदना, पाठीचा त्रास किंवा श्वसनाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. तथापि, वैद्यकीय सल्ल्याने, शारीरिक व्यायामाने आणि फिजिओथेरपीने या अडचणींवर नियंत्रण ठेवता येते. यापेक्षा मोठी अडचण असते ती म्हणजे समाजाचा या व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन होय. आजही लघुदेही व्यक्तींना 'छोटे', 'कॉमेडी कॅरेक्टर', 'विदूषक', बुटके, ठेंगणे किंवा 'नवलाईचा विषय' म्हणून पाहिले जाते. मनोरंजन विश्वात त्यांच्या भूमिकांना अनेकदा केवळ हास्याचे साधन बनवले जाते. अशा मानसिकतेमुळे त्यांच्या आत्मसन्मानावर आ-घात होतो. शारीरिक उंची हा त्यांचा दोष नाही, तरी समाज त्यांच्या आत्मविश्वासाला 'हास्याचा विषय' बनवतो. हे खरे तर मानवी संवेदनशीलतेचे अपयश आहे. कोणत्याही समाजाचा दर्जा त्याच्या तंत्रज्ञानावर नव्हे, तर त्याच्या दयाळूपणावर मोजला जातो. आणि या दृष्टीने पाहिले तर, लघुदेही व्यक्तींविषयीचा आपला दृष्टिकोन अजूनही सुधारण्यास हवा.

या जागरूकता दिनामागे एक प्रेरणादायी इतिहास आहे. २५ ऑक्टोबर हा दिवस निवडण्यात आला कारण याच दिवशी अमेरिकन अभिनेता आणि समाजसेवक बिल बोवेन यांचा जन्म झाला होता. त्यांनी १९५७ मध्ये "Little People of america' या संस्थेची स्थापना करून लघुदेही व्यक्तींच्या हक्कांसाठी आयुष्यभर काम केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे जागतिक स्तरावर या विषयाला ओळख आणि सन्मान मिळू ला-गला. त्याच स्मृतीप्रीत्यर्थ हा दिवस आज जागतिक चळवळ बनला आहे. भारतातही या क्षेत्रात जागरूकतेचा प्रसार वाढू लागला आहे. Rights of Persons with Disabilities act, 2016 या कायद्यानुसार लघुदेहत्वाला अपंगत्व म्हणून मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि सार्वजनिक सुविधा यांमध्ये त्यांना समान संधी मिळावी, हे सरकारचे धोरणात्मक दायित्व ठरते. पण कायद्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामाजिक स्वीकार होय. कारण, स्वीकाराशिवाय समानतेचा कायदाही निरर्थक ठरतो.

लघुदेही व्यक्तींना समाजात सर्वाधिक भेदभाव शिक्षण आणि रोजगार क्षेत्रात सहन करावा लागतो. शाळांमधील बाकं, फळे, दारं, स्वच्छतागृहं या सर्व सुविधा सामान्य उंचीच्या लोकांसाठी रचल्या जातात. परिणामी, लघुदेही मुलांना दैनंदिन शालेय व्यवहारात असुविधा भासते.

त्याहून गंभीर बाब म्हणजे, अनेक शिक्षक आणि सहाध्यायी त्यांच्या उंचीचा उपहास करतात. यामुळे त्यांच्या आत्मविश्वासावर नकारात्मक परिणाम होतो. शैक्षणिक व्यवस्थेने ही गोष्ट ओळखून समावेशक शिक्षण पद्धती अंगीकारणे गरजेचे आहे, जिथे प्रत्येक विद्यार्थ्याची गरज ही प्रणालीच्या केंद्रस्थानी असेल. रोजगाराच्या क्षेत्रातही ही परिस्थिती फारशी वेगळी नाही. लघुदेही व्यक्तींना अनेकदा अयोग्य समजून नोकरीच्या संधी नाकारल्या जातात, जरी त्यांच्याकडे आवश्यक कौशल्य असले तरी. पण प्रत्यक्षात अशा व्यक्ती बौद्धिक, कलात्मक, व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करू शकतात. फक्त त्यांना संधी आणि स्वीकार आवश्यक आहे. खाज-गी क्षेत्रानेही सामाजिक उत्तरदायित्व म्हणून लघुदेही व्यक्तींसाठी अनुकूल कार्यक्षेत्र निर्माण करणे गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर भारतातील काही प्रेरणादायी व्यक्ती समाजासाठी दीपस्तंभ ठरल्या आहेत. नागपूरची ज्योती आमगे ही जगातील सर्वात कमी उंचीची महिला म्हणून ओळखली जाते.

## संत समागमाची तयारी पूर्णत्वाकडे

# आत्मचिंतनाच्या प्रकाशाने उजळलेला निरंकारी संत समागम

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/सत्गुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पवित्र आश्रयाखाली, ७८ वा वार्षिक निरंकारी संत समागम ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत संत निरंकारी आध्यात्मिक केंद्र, समलखा (हरियाणा) येथे अतुलनीय दिव्यता आणि भव्यतेने आयोजित करण्यात येणार आहे. भारत आणि परदेशातील असंख्य भक्त आत्मीयतेच्या आणि आनंदाच्या अनुभवाच्या या उत्सवात सहभागी होतील. भक्ती आणि समर्पणाने भरलेले हजारो भक्त आपापल्या प्रदेशातून आले आहेत आणि पूर्ण भक्ती आणि समर्पणाने दिवसरात्र सेवेत गुंतले आहेत, ज्यामध्ये मुंबई आणि महाराष्ट्रातील सेवादार देखील महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. सेव-ादार भक्तांच्या सततच्या सेवेमुळे, हा कार्यक्रम आता तयारीच्या अंतिम टप्प्यात आहे.

हा मेळावा केवळ धार्मिक किंवा वार्षिक कार्यक्रम नाही तर ज्ञान, प्रेम आणि भक्तीचा पवित्र संगम आहे, जो ब्रह्मज्ञानाद्वारे आत्म्याला परमात्म्याशी जोडण्यासाठी एक शक्तिशाली माध्यम म्हणून काम करतो. येथे, भक्त केवळ आध्यात्मिक जागृती प्राप्त करत नाहीत तर मानवता, वैश्विक बंधुता आणि परस्पर सौहार्दाची भावना देखील आत्मसात करतात. हा मेळावा आत्मनिरीक्षणाची एक दिव्य भूमी आहे, जिथे प्रत्येक साधकाला आत डोकावण्याची, आत्मनिरीक्षण करण्याची आणि त्यांची आध्यात्मिक चेतना जागृत करण्याची प्रेरणा मिळते.




हा संपूर्ण कार्यक्रम सतगुरु माताजींच्या दिव्य प्रेरणा आणि आशीर्वादाने आयोजित केला जात आहे. सतगुरुंना अशी इच्छा आहे की प्रत्येक भक्ताला या मेळाव्यात प्रेम, आदर आणि पुरेशा सुविधांचा अनुभव घ्यावा आणि ते आध्यात्मिकदृष्ट्या परिपूर्ण व्हावे.

संत निरंकारी मंडळाचे सचिव श्री जोगिंदर सुखीजा यांच्या मते, जे पूर्वी फक्त एक साधे मैदान होते ते आता संतांच्या समर्पित सेवेमुळे भव्य तंबूंच्या सुंदर शहरात रूपांतरित झाले आहे. हे दिव्य वातावरण प्रत्येक पाहुण्याला आकर्षित करते.

हे स्थळ एका दिव्य शहरात रूपांतरित झाले आहे. प्रशस्त पंडालांमध्ये भक्तांसाठी सुव्यवस्थित बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी होणारे प्रेरणादायी प्रवचन, भावपूर्ण स्तोत्रे आणि विचार अधिक प्रभावीपणे प्रदर्शित करण्यासाठी संपूर्ण ठिकाणी अत्याधुनिक एलईडी स्क्रीन बसवण्यात येत आहेत, जेणेकरून दुर्गम ठिकाणी राहणार्या भक्तांनाही सत्संगाचा लाभ घेता येईल आणि त्याच भावनेने, उर्जेने आणि अनुभवाने लाभ घेता येईल. संपूर्ण स्थळाचे कामकाज, वा-हतूक आणि सुविधांचे योग्य व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी चार प्रमुख विभागांमध्ये विभागले गेले आहे.

मागील वर्षांच्या परंपरेला पुढे नेत, या वर्षीही मुंबईतील भक्तांनी बांधलेले मुख्य स्वागत द्वार त्याच्या कलात्मक वैभवाने मेळाव्याच्या आध्यात्मिक साराचे प्रतिबिंब म्हणून उदयास आले आहे. हे द्वार केवळ सौंदर्याचे प्रतीक नाही तर समर्पण, सेवा आणि सर्जनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे. मेळाव्यात येणार्या भक्तांची संख्या जसजशी वाढत जाते तसतसे हे स्वागत द्वार त्याच्या स्वरूपात, विस्ताराने आणि प्रतिष्ठेने अधिकाधिक भव्य होत जाते, जणू काही ते सर्व मानवजातीला प्रेमाने, आपुलकीने आणि समतेने आमंत्रित करण्यास तयार आहे.

प्रत्येक सज्जन, महात्मा आणि धर्माभिमानी भक्ताला या पवित्र संत समागमात हार्दिक आमंत्रण आहे. या, या आध्यात्मिक संगमाचा आणि भक्तीच्या भव्य मेळाव्याचा भाग व्हा, सद्गुरुंचे दिव्य दर्शन घ्या, त्यांच्या अमृतसारख्या प्रवचनांचा लाभ घ्या आणि आत्म्याला परमात्म्या

# अस्पृश्यतेविरुद्धची सामाजिक लढाई

१८ ऑक्टोबर १९०६ रोजी स्थापन झालेल्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ने भारतीय समाज सुधारणा चळवळीत एक ऐतिहासिक टप्पा निर्माण केला. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या संस्थेचा मुख्य उद्देश अस्पृश्यता निर्मूलन, दलित समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी कार्य करणे हा होता. त्या काळातील भारतीय समाज गहन जातीभेद आणि अस्पृश्यतेच्या अंधश्रद्धेच्या कचाट्यात होता. बहुतेक दलित लोकांना मुलांना शिक्षण मिळत नसे, रोजगाराच्या संधी अत्यल्प होत्या आणि समाजातील समानतेचा विचार जवळपास अस्तित्वातच नव्हता. या पार्श्वभूमीवर 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना समाजातील प्रगतिशील विच-ारसरणी आणि सामाजिक न्यायाची गरज लक्षात घेऊन झाली.

'डिप्रेस्ड क्लास मिशनच्या स्थापनेसाठी 'प्रार्थना समाज' आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरला. १९०७ मध्ये 'पारेल' येथे पहिली शाळा सुरू करून मिशनने दलित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी दिली. शिक्षणाद्वारे समाज बदलण्याचा हा प्रयत्न त्या काळात अत्यंत धाडसी मानला जात होता. शिक्षण ही केवळ ज्ञान मिळवण्याची संधी नव्हती, तर समाजातील आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्याचे महत्त्वाचे साधनही ठरले. मुलांना मिळालेल्या शिक्षणामुळे त्यांचा आत्मसन्मान वाढला आणि समाजील अन्य लोकांबरोबर समानतेचा अनुभव त्यांना लाभला.

'डिप्रेस्ड क्लास मिशन'चे उद्दिष्ट केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते; सामाजिक सुधारणा, आर्थिक सक्षमीकरण आणि धार्मिक समता या क्षेत्रातही मिशनने ठोस काम केले. अस्पृश्यतेविरुद्ध जनजागृती करण्यासाठी विविध सभा, चर्चासत्रे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले गेले. लोकांना सामाजिक समतेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला गेला. समाजातील जुनाट रूढी, जसे की अस्पृश्यतेवर आधारित छळ, जातीव्यवस्थेतील असमानता आणि स्त्रियांवरील भेदभाव, यांचा विरोध करण्यासाठी मिशनने ठोस पावले उचलली.

शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी ही मिशनची अत्यंत महत्त्वाची बाजू ठरली. दलित मुलांना शिक्षण देऊन नोकरी व आर्थिक संधी उपलब्ध करून देणे तसेच समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे हे मिशनचे प्राथमिक उद्दिष्ट होते. मिशनच्या शाळांमध्ये मुलांना केवळ पारंपरिक शिक्षणच नव्हे, तर सामाजिक मूल्ये, मानवाधिकार, आत्मसन्मान आणि समानतेचा संदेश दिला जात असे. या शाळांमुळे दलित मुलांचा आत्मविश्वास वाढला आणि समाजातील इतर वर्गांसोबत त्यांचा समन्वय सुधारला.

आर्थिक सक्षमीकरण हे मिशनचे आणखी एक महत्त्वाचे अंग होते. दलित समाजातील लोकांना व्यवसाय प्रशिक्षण, हस्तकला, आणि इतर कौशल्ये शिकवून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या. यामुळे आर्थिक स्थिती सुधारली तसेच समाजातील आत्मसन्मान आणि स्वावलंबनाची भावना विकसित झाली. आर्थिक सक्षमीकरणामुळे दलित समाजातील लोकांनी आपले हक्क सुरक्षित करण्यास प्रोत्साहन मिळाले आणि सामाजिक भेदभावाविरुद्ध उभे राहण्याची क्षमता वाढली.

धार्मिक समता ही मिशनची आणखी एक महत्त्वाची भूमिका ठरली. धर्मांच्या नावाखाली होणाऱ्या भेदभावाला विरोध करून सर्व धर्मांमध्ये समानता प्रस्थापित करण्याचा संदेश मिशनने दिला. मिशनच्या कार्यामुळे समाजात धार्मिक समतेविषयी जागरूकता वाढली आणि दलित समाजाला सामाजिक न्यायाच्या मार्गावर टाकण्यास मदत झाली.

समाजावर मिशनच्या कार्याचा खोल परिणाम दिसून आला. शिक्षणामुळे दलित मुलांना उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाल्या, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा झाली. सामाजिक जनजागृतीमुळे अस्पृश्यता विरोधी चळवळींना चालना मिळाली आणि समाजातील वाईट रूढी, भेदभाव व असमानतेवर खुल-ासा झाला. आर्थिक सक्षमीकरणामुळे दलित समाजाचे व्यक्ती स्वावलंबी झाले आणि त्यांनी समाजातील निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. धार्मिक समतेच्या प्रचारामुळे समाजातील सामूहिक सहिष्णुता वाढली आणि भेदभावाच्या प्रथा कमी होऊ लागल्या.

आजही 'डिप्रेस्ड क्लास मिशन'चे महत्त्व कमी झालेले नाही. स्थापनेपासून जवळपास ११८-११९ वर्षांनंतरही त्याचे उद्दिष्ट आणि कार्य समाज सुधारण्यासाठी प्रेरणास्त्रोत आहेत. शैक्षणिक संस्था, वाचनालये, सामाजिक कार्यक्रम आणि आरोग्य सेवा केंद्रे मिशनच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. मिशनच्या कार्यामुळे निर्माण झालेला सामाजिक वारसा आजच्या काळातही दलित समाजाच्या उन्नतीसाठी प्रेरणा देतो.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ही केवळ सामाजिक संस्था नाही, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवणारा प्रबळ यंत्र आहे. अस्पृश्यतेविरुद्धचा संघर्ष, समाजातील समता, आर्थिक सक्षमीकरण आणि धार्मिक समतेसाठी केलेले प्रयत्न हे मिशनच्या सामाजिक कार्याचे मूळ आधार आहेत. दलित समाजाची उन्नती आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे मिशनचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे, जे आजही समाज सुधारणा चळवळीतील प्रेरक ठरते.

डिप्रेस्ड क्लास मिशनच्या स्थापनेचा परिणाम केवळ शिक्षणापुरता मर्यादित नसून सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रातही खोलवर पडला. दलित समाजाच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, आत्मसन्मान वाढवण्यासाठी, आणि समाजातील असमानता कमी करण्यासाठी मिशनचे कार्य अद्वितीय ठरले.

आजही या मिशनच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या शाळा, व्यावसायिक प्रशिक्षण संस्था आणि सामाजिक कार्यक्रम दलित समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देत आ-हेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, डिप्रेस्ड क्लास मिशनने भारतीय समाजात जातीय असमानतेविरुद्ध एक ठोस यंत्र तयार केले. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक जागरूकता आणि धार्मिक समतेवर आधारित या यंत्रामुळे समाजातील दलित समाजाला स्वतःचे हक्क मिळवण्याची क्षमता प्राप्त झाली. यामुळे समाजात समानतेवर आधारित नवे धोरण आणि विचारसरणी रुजली, जी आजही कार्यरत आहे.

निष्कर्षतः, डिप्रेस्ड क्लास मिशन ही सामाजिक परिवर्तनाची प्रेरक संस्था आहे. अस्पृश्यतेविरुद्धचा संघर्ष, दलित समाजाची उन्नती, आणि समाजातील समानतेसाठी केलेले प्रयत्न हे मिशनचे मूलभूत ध्येय आहेत. १८ ऑक्टोबर रोजी या मिशनचा स्थापना दिन साजरा करून समाजातील समानतेची आणि सामाजिक न्यायाची जाणीव वाढवणे आवश्यक आहे. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या कार्यामुळे दलित समाजाच्या उन्नतीसाठी स्थिर पाया रचला गेला आहे आणि आजही त्याचा सामाजिक वारसा समाजात उजळून दिसतो.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## आजाद समाज पार्टीच्या नांदेड जिल्हा कार्यालयाचे पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उध्दवराव सरोदे यांच्या हस्ते शानदार उद्घाटन


**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड /प्रतिनिधी**/येथे आजाद समाज पार्टी नांदेड जिल्ह्याचे फारच कमी वेळात नव्यानेच पार्टीचे जिल्हा प्रभारी म्हणून निवड झालेले प्रभाकरराव वाघमारे यांनी पार्टीचे नांदेड जिल्हा कार्यालय नवीन कोठा नांदेड सुरूवात करून या नवीन कार्यालयाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे अर्धापूर तालुकाध्यक्ष उध्दवराव सरोदे यांच्या हस्ते शानदार पध्दतीने केले.याच कार्यक्रमात पार्टीचे नांदेड जिल्हा प्रभारी मा.प्रभाकर वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तर बीजेपी ही सापनाथ आहे .

या सर्व सापांना साफ करण्याचे काम आजाद समाज पार्टी करेल असे प्रखर मत त्यांनी व्यक्त केले.कार्यलयाचे उद्घाटक पत्रकार संघाचे अर्धापूर तालुकाध्यक्ष मा.उध्दवराव सरोदे हे बोल-ताना म्हणाले की,आजाद समाज पार्टीच्या नवीन कार्यालयाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन व सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पार्टीची कमी वेळात जास्तीत जास्त प्रगती होवून आगामी निवडणुकीसाठी पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांनी




बहुजन नायक मान्यवर कांशीराम साहेब यांच्या स्मृतिदिना निमित्त सर्व महापुरुषांना त्रिवार वंदन करण्यात आले.यावेळी मनोगतात आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आजाद समाज पार्टी आपले खाते खोलून दाखवेल असा दावा करून महापुरुषांचे स्वप्न साकार करण्यासाठी आजाद समाज पार्टी ही मोठ्या ताकतीने बहुजनांचे स्वप्न साकार करण्यासाठी पुढे आली असून आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आजाद समाज पार्टी ही स्वबळावर निवडणूक लढवून आपले खाते खोलेल आणि मान्यवर कांशीराम साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त बहुजन बांधवांना आजाद समाज पार्टीच्या माध्यमातून मनुवादी व्यवस्थेला इशारा दिला आहे की,ईतर सर्व पक्ष हे नागनाथ आहेत, मेहनत घेवून कामाला लागावे व यश मिळवावे असे उद्घाटनपर भाषणात मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला सर्व जिल्ह्याचे पदाधिकारी त्यामध्ये नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष विनायक लोहकरे,लोहा तालुकाध्यक्ष देवानंद जोंधळे,जिल्हा महासचिव गोविंद चाटसे ,जिल्हा सचिव किशोर जोंधळे,चांदू लोहकरे संदीप गायकवाड,आशिष लोखंडे संतोष गाडे,संतोष लोखंडे,केशव गायकवाड,कोंडीबा गायकवाड विनायक कांबळे,राजू मुंडे,चंद्रकांत गाडे, संदीप जायभाये, संतोष राठोड धुरपताताई जाधव, सरस्वतीताई भालेराव महिला जिल्हाध्यक्ष यांच्या सह ईतर कार्यकर्ते उपस्थित होते. शैवटी सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले व हा कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला.





# सुरेश दंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या गंगापूर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी**/बाबरगाव (ता. गंगापूर) येथील समाजनिष्ठ कार्यकर्ते सुरेश रामनाथ दंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या गंगापूर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आली. या प्रसंगी तालुकाध्यक्ष संजय जाधव, प्रदेश सरचिटणीस दिलीप बनकर, जिल्हा सरचिटणीस रामेश्वर चव्हाण, जिल्हा सचिव मच्छिंद्र पठाडे, तसेच सुधीर माने, राजू पठाण, कृष्णा दंडे, दादासाहेब दंडे, सोमनाथ दंडे, नामदेव दंडे, सुरेश सातपुते, गोपी- नाथ पठाडे, गणेश सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. या नियुक्तीबद्दल आमदार सतीश चव्हाण, संजय जाधव, दिलीप बनकर, सुधीर माने, मच्छिंद्र पठाडे यांनी सुरेश दंडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, गंगापूर ते म्हणाले की, पक्षाध्यक्ष अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन अधिक प्रभावी करण्यासाठी सुरेश दंडे यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. गंगापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटन कार्याला नवे बळ मिळावे आणि पक्षाची विचारधारा अधिकाधिक जनतेपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने ही नियुक्ती केल्याचे पक्षाच्या सूत्रांनी सांगितले.

# गंगापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान. ' शिवतीर्थ ' येथे दीपोत्सव सोहळा उत्साहात!

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी / सुभान शहा**/'पहिला दिवा माझ्या राजाच्या चरणी' ही भावना घेऊन गंगापूर येथील यंदाचा शिवतीर्थ सोहळा म्हणजेच दीपोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा झाला. शिवतीर्थ समिती गंगापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या भव्य सोहळ्यामुळे संपूर्ण शिवतीर्थ परिसर दिव्यांच्या तेजाने लखलखून निघाला. छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे दिवाळी असल्याच्या निमित्ताने, शिवतीर्थ येथे दीप प्रज्वलित करण्यात आल्या. याशिवाय, शिवतीर्थ येथील प्रत्येक कड्यावर, तटांवर आणि पायऱ्यांवर शेकडो पणत्या आणि दिव्यांच्या माळा लावण्यात आल्या होत्या.

या अभूतपूर्व दीपोत्सवामुळे महाराजांचा ऐतिहासिक दरारा आणि वैभव पुन्हा एकदा जिवंत झाल्याची भावना शिवभक्तांनी व्यक्त केली. या सोहळ्यासाठी शहरातील शिवभक्त शिवतीर्य येथे दाखल झाले होते. सायंकाळी, छत्रपती शिवाजी महाराजांची 'जय शिवाजी! जय भवानी!' च्या घोषणांनी संपूर्ण शिवतीर्थ दणाणून गेला.

या दीपोत्सवात नगरसे- वक प्रदीप पाटील सह अनेक शिवभक्त, महिला मंडळे आणि स्थानिक तरुणांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

या सोहळ्यामुळे दिवाळीच्या मंगलमय वातावरणात शिवसंस्कृती आणि राष्ट्रप्रेमाचे दर्शन घडले.




# सावळदबारा -देऊळगांव गुजरी रस्त्यात खड्डे की खढ्यात रस्ता

**आत्ताच एक्सप्रेस**

**सावळदबारा/ प्रतिनिधी**/सावळदबारा -देऊळगांव गुजरी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडलेमुळे त्यामुळे गाडी चालवताना अडचण निर्माण होत आहे संबंधित विभागाने यांकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व वा- हनधारक करित आहेत सावळदबारा -देऊळगाव या रस्ता १० कि. मी रस्ता आहेत या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे मोठमोठे पडले असुन भाविक भक्तांना त्रास सहन करावा लागत आहे सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामीचे मंदिर आहे मोठ्या प्रमाणात विविध राज्यातील भाविक भक्त सावळदबारा येथे येत असतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनधारक गाडी चालवाताना खड्ड्या मुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहेत. सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामीचे मंदिर आहेत दर्शन घेण्यासाठी विविध राज्यातील भाविक भक्त याच सावळदबारा -देऊळगाव रस्त्यावरून ये जा करतात.

सावळदबारा या ठिकाणी काम निमित्त येण्यासाठी परिसरातील ग्रामस्थांना याच रस्त्यावरून ये-जा करावी लागते.सावळदबारा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँक,जिल्हा मध्यवर्ती बँक,शाळा,कॉलेज, महाविद्यालय, महावितरण कार्यालय, पोस्ट ऑफिस, पोलीस चौकी,पशु वैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र, या ठिकाणी सावळदबारा आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांना येथे दररोज सावळदबारा येथे काम निमित्त ये.जा करावी ला- गते त्यामुळे सावळदबारा ते देऊळगांव गुजरी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आ- हेत.सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामी मंदिर आहेत या ठिकाणी विविध राज्यातील भाविक भक्त दर्शन घेण्यासाठी येथे येतात भाविक भक्त देऊळगाव गुजरी पास- न सावळदबारा येतात रोडवर खड्डे पडले आहेत. मोठमोठे खड्डे होत आहे सावळदबारा,देव्हारी, नांदातांडा, घाणेगाव,मोलखेडा, टिटवी, पळसखेडा, महालब्धा, पिंपळवाडी,मूर्ती, आदी परिसरातील ग्रामस्थांना सावळदबारा येथे काम साठी दररोज काम निमित्त सावळदबारा या ठिकाणी ये जा करावी लागते तसेच सोयगाव येथे काम निमित्त जाण्यासाठी याच सावळदबारा -देऊळगाव गुजरी या रस्त्यावरून ये जा करावी लागते.सावळदबारा ते देऊळगाव या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे आहेत रात्रीच्या वेळी रस्त्यावरून जाताना खड्ड्यात गाडी आदळत आहे त्यामुळे वाहनाचे सुद्धा नुकसान होत आहे. सावळदबारा ते टिटवी या रस्त्यावर सुद्धा ठिकठिकाणी खड्डे पडले असून या रस्त्यावर सुद्धा वाहनधारकांना गाडी चालवणे अवघड झाले



सावळदबारा देऊळगाव रस्त्यावर खड्डे पडले



टिटवी रोडवर खड्डे पडले

टिटवी गावापासुन चढ पर्यंत मोठमोठे खड्डे पडले असून त्यातील गिट्टी बाहेर आले आहे त्यामुळे रात्रीच्या वेळेस वाहनधारकाना या ठिकाणी गाडी चालवताना मोठी अडचण निर्माण होत आहे टिटवी रोडवर खड्डे मोठमोठे होत आहे त्यातील गिट्टी बाहेर आली आहे. संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व वा- हनधारक करीत आहेत.

सावळदबारा- देऊळगाव गुजरी रोडवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत खड्डे मोठमोठे होत आहेत टिटवी गावापासून चढ पर्यंत रोडवर खड्डे पडले असून त्यातील गिट्टी बाहेर आली आहे वाहनधारकांना गाडी चालवणे या रस्त्यावर अवघड झाले आहे त्यामुळे लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व वाहनधारक करीत आहेत.

# स्थानिक निधीतून विकासकामांना गती



**आत्ताच एक्सप्रेस**

**सुखापूरी /प्रतिनिधी**/करंजळा (ता. अंबड) येथे स्थानिक आमदार निधीतून मंजूर झालेल्या १० लाख रुपयांच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचे लोकार्पण आज (दि. २३ ऑक्टोबर २०२५) आमदार हिम्मत दादा उढाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या नवीन रस्त्यामुळे करंजळा ग्रामस्थांना दळणवळणासाठी मोठा दिलासा मिळाला असून, यामुळे गावातील विकासकामांना आणखी गती मिळेल, असे मत आमदार उढाण यांनी यावेळी व्यक्त केले.

आमदार हिम्मत दादा उढाण यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे करंजळा येथील रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. या रस्त्याचे काम नुकतेच पूर्ण झाले असून, आज सायंकाळी ४:३० वाजता लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी आमदार उढाण यांच्या हस्ते फीत कापून व नारळ फोडून रस्त्याचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी ते म्हणाले की, सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचविण्यासाठी व मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी शासन कटीबद्ध आहे.या महत्त्वपूर्ण समारंभास बापुराव देशमुख, प्रशांत उढाण,अविनाश मांगदरे, अशोक बोटे, राजेंद्र मोताळे तसेच करंजळा गावाती उपस्थीत होते.

## अशोक जोशी यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर /प्रतिनिधी/**
वैजापूर मर्चंटस को-ऑपरेटिव्ह बँकेचे निवृत्त व्यवस्थापक अशोक गोपाळराव जोशी (वय ७६, हरिदास गल्ली) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे. ते वर्धमान पतसंस्थेचे कर्मचारी रोहित जोशी यांचे वडील होत. आमदार रमेश बोरनारे, माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, बाळासाहेब संचेती, धोंडीरामसिंह राज- पूत, घन:श्याम वाणी, विजय वेद यांनी आदरांजली वाहिली. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात वैजापूर येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जनआक्रोश मोर्चाला मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडचा जाहीर पाठिंबा

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी /सुभान शहा/**
वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २४ ऑक्टोबर रोजी काढण्यात आलेल्या जनआक्रोश मोर्चाला मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडने जाहीर पाठिंबा दिला आहे. देशातील वाढती विषमता, बेरोजगारी, शिक्षणातील महागाई, शेतकऱ्यांची स्थिती, भ्रष्टाचार आणि महागाईसारख्या जनजीवनाशी निगडित प्रश्नांकडे दुर्लक्ष करून जातीय आणि धार्मिक वाद पेटविण्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भातील पाठिंब्याचे पत्र वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश सचिव अमित भुईंगळ यांना जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड योगेश शेळके (धामोरीकर), राहुल बनस- ोड, योगेश पाथ्रीकर, प्रदेश सचिव आत्माराम शिंदे आणि प्रदेश उपाध्यक्ष सोमेश्वर आहेर यांनी सुपूर्द केले. मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ठडड जाणीवपूर्वक समाजात जात-धर्माच्या ना- वावर फूट पाडत असून, तरुणांना शिक्षण व रोजगाराच्या मूलभूत प्रश्नांपासून दूर ठेवत आहे. छत्रपती संभाजीनगर येथील सामाजिक कार्यकर्ते विजय वाहुळ आणि राहुल मकासरे यांनी शैक्षणिक संस्थांमधील 'गेळप ठडड' अभियानाला विरोध केल्याने त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांवर दबाव आणून ठडड चे संरक्षण करणे हा न्याय आणि संविधानाचा अपमान आहे, असा आरोप करण्यात आला आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळापासून ठडड ने बहुजन महापुरुषांचे विचार दडपण्याचे आणि समाजात विषमता वाढविण्याचे काम केले आहे. राष्ट्रप्रेमाच्या



नावाखाली तरुणांच्या मनात कट्टरवाद पेरण्याचा प्रयत्न होत असून, लोकशाहीच्या मूळ तत्त्वांना धोका निर्माण झाला आहे. संविधानातील समता, न्याय, बंधुता आणि स्वातंत्र्य या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी ठडड वर कायमस्वरूपी बंदी घालावी, अशी मागणी मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडतर्फे करण्यात आली आहे. देशा- तील लोकशाही आणि संविधानवादी मूल्ये टिकविण्यासाठी हा लढा आवश्यक आहे, असे मत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

# वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडल्याने कापूस आणि मक्का अक्षरश आडवे झाले पिकाचे मोठे नुकसान

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी**/गंगापूर प्रतिनिधी गंगापूर तालुक्यात वैजापूर मतदार संघात वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे आगाठाण,महेबुबखेडा ,भागांतील गट नंबर ४३, या शेतकऱ्याचे मका आणि अनेक शेतकऱ्याचे कापूस पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके आडवी पडून भिजली आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्याने शेतकऱ्यांना आता पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे दोन दिवसापूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यासह अति मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला आहे या पावसाने कापूस आणि मका पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेचे शेतकरी हिरालाल पटरे यांनी सांगितले आता शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.अनेक शेतांमध्ये कापूस आणि मका पिके वादळी वाऱ्यामुळे पूर्णपणे आडवी पडली आहेत. कापसाच्या फुलपांढ्या तुटल्या असून, त्या आडव्या झाल्या आ- हेत. आणि शेतरस्त्यांचे पाणी शेतात शिरल्याने कापसाचे पीक पिवळे पडून ते खराब होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. उभ्या पिकांचे असे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची तातडीने दखल घ्यावी अशी मागणी. शेतकरी हिरालाल पटरे यांनी केली आहे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांचे तात्काळ पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाईची रक्कम लवकरात लवकर द्यावी, असे आवाहन त्यांनी प्रशासनाकडे केले आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या या नुकसानीची गंभीर दखल घेऊन त्यांना आर्थिक मदत करावी, तलाठी यांनी लवकरात लवकर पंचनामे करून घ्यावे अशी मागणी शेतकरी करीत आहे.

# संक्षिप्त

## पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना दौरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तसेच पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे शनिवार दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ७.०० वाजता रामटेक शासकीय निवासस्थान मुंबई येथुन शासकीय वाहनाने जि. जालनाकडे प्रयाण करतील. दुपारी १२.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आगमन दुपारी १२.३५ ते २.३० वाजता जालना जिल्ह्यातील विविध विषया संदर्भात प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेणार आहेत. दुपारी ४.०० वाजता भाजपा जिल्हा कोअर कमिटी सदस्यांसोबत बैठक स्थळ आमदार संतोष दानवे यांचे निवासस्थान. सायंकाळी ५.३० वाजता जालना येथुन परळी वैजनाथ जि. बीडकडे प्रयाण करतील.

## शासकीय आश्रमशाळेसाठी कंत्राटी शिक्षक पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस / जालना (प्रतिनिधी)** आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक या कार्यालयाच्या आदेशानुसार लातूर, बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे बाह्यस्त्रोत संस्था छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था व महाराष्ट्र विकास ग्रुप यांच्यामार्फत तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येणार आहे. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातंर्गत एकुण ८ शासकीय आश्रमशाळा असून या आश्रमशाळांमधील प्राथमिक शिक्षक, पदवीधर प्राथमिक शिक्षक व माध्यमिक शिक्षक या रिक्त पदावर (कंत्राटी पदे), पात्र उमेदवारांना अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी अपर आयुक्त नाशिक व ठाणे https://scsmltd.com/ अपर आयुक्त अमरावती व नागपुर https://mvgcompany.in या लिंकवर अर्ज भरण्याची कार्यवाही दि. २० ते ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत करण्याचे आवाहन अधिक्षक आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा,पावसाची शक्यता दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. २४ ऑक्टोबर व २५ ऑक्टोबर २०२५ रोजी यलो अलर्ट जारी केला असुन, तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. २६ ते २८ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शशीकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत युवा आणि क्रीडा संवाद

**आत्ताच एक्सप्रेस जालना (प्रतिनिधी)**मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ यांच्या अध्यक्षतेखाली विकसित महाराष्ट्र २०४७अंतर्गत राज्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, राष्ट्रीय व राज्य युवा पुरस्कारार्थी, युवकांसाठी कार्य करणा-या संस्था, क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक, खेळाडूंचे पालक, संघटनांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत युवा व क्रीडा संवाद आयोजित करण्यात येत आहे.युवा व क्रीडा संवादाचा मुख्य उद्देश म्हणजे राज्यातील युवा आणि क्रीडा क्षेत्रातील युवक, युवती, खेळाडू, क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक, खेळाडूंचे पालक, संघटनांचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या अडी-अडचणी समजून घेऊन क्रीडा क्षेत्रात आमुलाग्र बदल घडविण्याचे व्यासपीठ आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील विकसित महाराष्ट्र २०४७अंतर्गत युवा आणि क्रीडा संवाद हा कार्यक्रम दिनांक २५ ऑक्टोबर, २०२५रोजी सकाळी ११.००वाजता संत एकनाथ रंगमंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

## 'स्वच्छता प' निरुपयोगी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** शहरातील 'स्वच्छता प'च्या निष्क्रियतेमुळे निर्माण झालेल्या गंभीर सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षिततेच्या प्रश्नांवरून वकील महेश एस. धन्नावत यांनी जालना जिल्ह्याचे खासदार श्री. कल्याण काळे यांना एक सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनात, पच्या अपयशामुळे शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून, त्यामुळे दोन अल्पवयीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.धन्नावत यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने सुरू केलेले 'स्वच्छता प' केवळ नावापुरते उरले आहे. या पवर नागरिक तक्रारी करूनही त्याची दखल घेतली जात नाही. शहरात कचऱ्याचे ढीग साचले आ-हेत, ज्यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या अनियंत्रितपणे वाढली आहे.या गंभीर समस्येचे भयंकर परिणाम समोर आले असून, जालना शहरातील यशवंत नगर परिसरात परी दीपक गोस्वामी (वय ३) या चिमुकलीचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. तर गांधी नगर भागात संध्या पाटोळे (वय ८) या मुलीलाही भटक्या कुत्र्यांनी आपले लक्ष्य बनवले, ज्यात तिचा जीव गेला. या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वाता-वरण पसरले आहे.शहरातील अनियंत्रित आणि अस्वच्छ मांस विक्रीच्या दुकानांमुळे भटक्या कुत्र्यांची समस्या अधिकच गंभीर बनली आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी उघड्यावर मांस विक्री होत असून, दुकानांमधून बाहेर फेकले जाणारे अवशेष कुत्र्यांना आकर्षित करतात. यावर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.






उघड्यावर मांस विक्री करणा-यांविरुद्ध सलग दुस-या दिवशी कारवाई



जालना जिल्हा कारागृहात महात्मा गांधी विचार प्रेरणा परीक्षेचा पारितोषिक वितरण समारंभ

# दानवे परिवाराच्या वतीने दीपावली स्नेहमिलन कार्यक्रम संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षाने आपसातील राजकीय मतभेद विसरून एकत्रित येऊन विकास साध्य करण्याचे आवाहन माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी जालना येथे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दीपावली स्नेह मिलन कार्यक्रमात केले. जालना शहरात सामाजिक ऐक्य व आत्मीयतेचे प्रतीक ठरणारा दीपावली स्नेहमिलन सोहळा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे व जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता, हा कार्यक्रम आज शुक्रवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत भारती लॉन्स, बालाजी चौक, भोकरदन रोड, जालना येथे संपन्न झाला.

यावेळी माजी मंत्री राजेश टोपे, माजी मंत्री आ.अर्जुनराव खोतकर, भाजपा जिल्हाध्यक्ष तथा आ.नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंटयाल माजी आमदार अरविंद चव्हाण, माजी आमदार संतोष सांबरे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, सतीश घाटगे, घनश्याम गोयल, अशोक आण्णा पांगारकर, राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, विमलताई आगलावे, सुधाकरराव दानवे, युवानेते अक्षय गोरंटयाल, अर्जुन गेही, संध्याताई देठे, अरुणा जाधव, ब्रम्हानंद चव्हाण, शिवाजीराव थोटे, ॲड बाबासाहेब इंगळे, धनराज काबलीये, नगरसेवक सतीश जाधव, जिवन सले, शशिकांत घुगे, ज्ञानेश्वर ढोबळे, महेश निकम, सुनील राठी, रवी अग्रवाल उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, गोवर्धन अग्रवाल, मधुकरराव दानवे, अमोल कारंजेकर, वसंत शिंदे, महा-वीर ढक्का, विष्णू पाचफुले, सुनील पवार, सोपान पेंढारकर, वसंत जगताप, सुभाष बोडखे, मा.जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, बाबासाहेब कोलते, संजय आटोळे, भगवान मात्रे, गजानन नागवे, संजय डोंगरे, सिद्धिविनायक मुळे आदींची उपस्थिती होती.

यावेळी दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम प्रसंगी शुभेच्छा देताना माजी केंद्रीय राज्यमंत्री रावस-ाहेब पाटील दानवे म्हणाले की, मी १९९० ला पहिल्यांदा एकमेव कॉंग्रेस च्या राजवटीत भाजपचा आमदार झालो तेंव्हा पासून मी जालना जिल्ह्याच्या विकास कामासाठी व अनुशेष भरून काढण्यासाठी तत्कालीन सरकारच्या विरोधात आंदोलन केले



त्या नंतर १९९५ ला भाजपा युती ची सत्ता अस-ताना जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक कामे मंजूर केली व २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार मध्ये मी मंत्री व भाजपाचा प्रदेशाध्यक्ष असल्यामुळे केंद्र व राज्यशासनाच्या अनेक जनकल्याणकारी योजनेंचा फायदा जालना जिल्ह्यासाठी मिळवून दिला. त्यांनी पुढे बोलताना सर्व जालनावासियांना दीपावली व पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

आपल्या सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंद कायम नांदो असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी कैलासजी गोरंटयाल यांनी म्हटले की, जालना जिल्ह्याचे माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांच्या पराभवामुळे जिल्ह्याच्या विकासाचे मोठे नुकसान झाले असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, रावसाहेब दानवे यांनी मंत्रीपदाच्या काळात जिल्ह्यासाठी अनेक विकासकामे केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकल्पांना गती मिळाली होती. त्यांच्या पराभवामुळे केंद्रातील प्रतिनिधित्व कमी झाले असून, त्याचा थेट परिणाम जिल्ह्याच्या विकासावर झाला आहे, यापुढील कोणत्याही निवडणुकीत भाजपाचा पराभव होणार नसून विजय होणार आहे व जालना जिल्हा भाजप-ाचा बालेकिल्ला असल्याचे असे त्यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813